# प्रेसनोट दिनांक ०६/०५/२०२३

## हायवे रोडवर रॉबरी करणारे ०३ आरोपी अटक
## खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा यांची कामगिरी

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील जबरी चोरी, चेन स्नॅचिंग, वाहन चोरी, मोबाईल चोरी, घरफोडीचे गुन्हयास प्रतिबंध व्हावा व गुन्हे उघडकीस आणावेत याबाबत वरिष्ठांनी दिलेल्या सुचनाप्रमाणे, खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे, खंडणी विरोधी पथकातील स्टाफ खाजगी वाहनाने पुणे- मुंबई हायवेवर पेट्रोलींग करत असताना, एका ग्रे रंगाची नंबरप्लेट नसलेली ॲक्टीव्हा मोपेड गाडीवरुन ट्रिपल सीट इसम जाताना दिसल्याने, त्यांना थांबण्याचा इशारा केला असता, ते न थांबता जावु लागल्याने, त्यांचा अधिक संशय आल्याने, पोहवा सुनिल कानगुडे, पोहवा विजय नलगे, पोहवा प्रदीप गोडांबे व पोना गणेश गिरीगोसावी यांनी पाठलाग करुन, थोडया अंतरावर ॲक्टीव्हा मोपेडवरील ३ इसमाना पकडुन, त्यांना नावपत्ता विचारता, त्यांनी त्यांची नांवे १) अभिषेक लक्ष्मण भोसले वय-२० वर्षे रा. निर्मल बेतानी शाळेसमोर, विजयनगर, काळेवाडी, पुणे २)विजय सिध्दार्थ म्हस्के वय-२० वर्षे रा. शिंदे यांचे खोलीत, आझाद कॉलनी नं. ३, पाचपीर चौक, काळेवाडी, पुणे, ३)शांतकुमार चंद्रशेखर ददुल वय-२० वर्षे रा. पाडाळे यांचे खोलीत, क्रांती चौक, विजयनगर, काळेवाडी, पुणे असे सांगितले. नमुद इसमाना ॲक्टीव्हा मोपडसह ताब्यात घेवुन, खंडणी विरोधी पथक कार्यालयात आणुन, त्यांचेकडे कौशल्यपुर्ण तपास केला असता, त्यांनी **देहूरोड पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नंबर २५४/२०२३ भादवि कलम ३९२,३४ हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले.** त्यांचेकडुन **गुन्हयातील चोरीस गेलेला लॅपटॉप, गुन्हयात वापरलेली ॲक्टीव्हा मोपेड, एक लोखंडी कोयता व ०२ मोबाईल फोन असा एकुण ९५,२००/-रु किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला** असुन, नमुद आरोपीतांना पुढील कार्यवाहीकामी देहूरोड पोलीस ठाणे येथे हजर केले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास देहूरोड पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

**आरोपी अभिषेक लक्ष्मण भोसले व विजय सिध्दार्थ म्हस्के हे पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन, त्यांचे विरुध्द दरोडा व जबरी चोरीचे गुन्हे दाखल आहेत.**

**सदरची कारवाई मा. विनय कुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.डॉ.संजय शिंदे, सह पोलीस आयुक्त, मा.वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, मा.स्वप्ना गोरे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, मा.श्रीकांत दिसले, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.पद्माकर घनवट, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे -१, यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पवार, सहा.पोलीस निरीक्षक उध्दव खाडे,सहा.पोलीस उप-निरीक्षक अशोक दुधवणे पोलीस अंमलदार सुनिल कानगुडे, विजय नलगे, गणेश गिरीगोसावी, किरण काटकर, प्रदीप गोडांबे व रमेश गायकवाड यांचे पथकाने केली आहे.**

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप-आयुक्त,
गुन्हे, पिंपरी चिंचवड